


# मीना राजू मंच

# उत्सव समतेचा

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.



## मीना राजू मंच

# उत्सव समतेचा

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## मीना राजू मंच – उत्सव समतेचा


- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन
- **प्रकाशक** : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रेरणा** : **मा. रनजीत सिंह देओल (भा.प्र.से.)**
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.
- **मार्गदर्शक** : **मा. सचिंद्र प्रताप सिंह (भा.प्र.से.)**
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **मा. आर. विमला (भा.प्र.से.)**
  राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **संपादक** : **मा. राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **सहसंपादक** : **श्रीम. अनुराधा ओक**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **डॉ. इब्राहिम नदाफ**
  उपसंचालक, समता विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी सहसंपादक** : **श्रीम. वर्षाराणी भोपळे**
  विभागप्रमुख, समता विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादन साहाय्य** : **श्रीम. सुजाता सावंत**
  कार्यक्रम अधिकारी, समता विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्रीम. वर्षा दुशी**
  अधीक्षक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रथम आवृत्ती** : मार्च २०२५
- **अर्थसाहाय्य** : 'स्टार्स' प्रकल्पांतर्गत, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
- **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.


- © सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

# प्रस्तावना

**उत्सव समतेचा :**

'लिंगभाव परिवर्तन कार्यक्रम' (Gender Transformative Programme) हा महाराष्ट्र राज्यातील धाराशिव जिल्ह्यामधील शासकीय व खाजगी अनुदानित शाळांमध्ये आणि त्याला जोडून असलेल्या गावांमध्ये 'युनिसेफ संस्थे'च्या सहकार्याने राबविला जात आहे. सद्यःपरिस्थितीत समाजात लिंगभाव आधारित जी विषमता आहे, त्याबद्दल सखोल विचार करून त्याबाबत दैनंदिन जीवनात बदल आणण्यास मदत करणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होय. यामध्ये मुला-मुलींना, शिक्षकांना, पालकांना आणि गावामधील नागरिकांना 'लिंगभाव' या विषयाबाबत जागृत करून, लिंगभाव असमानता समजून घेण्यास मदत केली आहे. पुरुषांच्या व स्त्रियांच्या तसेच अन्य लिंगी व्यक्तींच्या भूमिका ठरविणारे सामाजिक नियम तपासून व अत्याचाराच्या किंवा हिंसेच्या वापराला प्रश्नार्थक चिन्ह लावून लैंगिक समानतेचा पुरस्कार करण्यात आलेला आहे. प्राथमिक, माध्यमिक शाळेतील मुले-मुली, त्यांचे शिक्षक, पालक, गावकरी अशा अनेकांसोबत या कार्यक्रमांतर्गत काम करण्यात आले. त्यापैकी पालक व ग्रामस्थ यांच्यासोबत ज्या उपक्रमाच्या माध्यमातून काम करण्यात आले, तो म्हणजे 'उत्सव समतेचा!'

'उत्सव समतेचा' हा जास्तीत जास्त विद्यार्थी आणि गावातील लोकांपर्यंत पोहोचण्याच्या उद्देशाने केलेला कार्यक्रम आहे. या कार्यक्रमात गमतीच्या व ऊर्जाशील कार्यक्रमांच्या शृंखलेचा जसे की भूमिका करणे, खेळ, वादविवाद व चर्चा यांसारख्या सहभागात्मक कृतींचा वापर केला गेला असून या कृती शाळा आणि गाव यांच्या वेळेनुसार शाळेच्या किंवा गावाच्या वर्दळीच्या ठिकाणी करण्याचे नियोजन केले आहे.

जात, धर्म, लिंग, वर्ण, वर्ग, वेशभूषा, प्रांत, लैंगिक ओळख याच्याही पलीकडे जाऊन माणूस म्हणून आपण एक आहोत आणि सर्वांना उत्सवात सहभागी होण्याचा अधिकार आहे ही जाणीव निर्माण करणारा उत्सव म्हणून या कार्यक्रमाचे नाव 'उत्सव समतेचा' असे ठेवले गेले.

**उत्सव समतेचा गाव पातळीवर का करावा?**

व्यक्तिगत पातळीवर आपण लिंगभाव परिवर्तन प्रक्रिया हा एक केवळ कार्यक्रम नसून हा आपल्या सर्वांच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे हे समजून घेणे अतिशय गरजेचे आहे. आपण आपल्या आयुष्यात कसे वागतो? आपल्याला मुलगा आणि मुलगी म्हणून कशी वागणूक दिली जाते? जेव्हा मुलगा आणि मुलगी या दोन्ही चौकटीत बसत नाही, तेव्हा आपल्याला समाज कशा पद्धतीने वागवतो? या सर्वांचा आपल्या जीवनावर परिणाम होत असतो आणि आपण याच्या आधारावर आपल्या धारणा तयार करत असतो. आपण आपले विचार, मत या धारणांच्या आधारे बनवत असतो किंवा संपूर्ण आयुष्य या

धारणांच्या आधारे जगत असतो. धारणा वाईट की चांगल्या याचा विचार आपण कधीच करत नाही. लोकांनी सांगितले किंवा आपण जे पाहिले यावरच आपण विश्वास ठेवतो. शास्त्रशुद्ध पद्धतीने कधीच आपल्या बुद्धीला प्रश्न विचारत नाही. जर कोणी असे प्रश्न विचारले तर त्या व्यक्तीला आपण सामावून घेत नाही. अशा बऱ्याच घटना आपण आपल्या अवतीभवती बघत असतो.

लिंगभाव आधारित धारणांचा संबंध आपल्या भूमिका व जबाबदाऱ्यांशी, आपल्या कृती व संधींशी, आपल्याला काय करण्यास परवानगी आहे व काय करण्यास परवानगी नाही याच्याशी आहे. याचा संबंध आपल्या लैंगिक ओळखीशी आहे. याचा प्रभाव शिक्षण, आरोग्य, नातेसंबंध व करिअर यांसारख्या आपल्या महत्त्वाच्या निर्णयावर पडत असतो.

लिंगभाव ही एक निरंतर प्रक्रिया आहे; जी आपण आपल्या जन्मापासून ते शेवटपर्यंत अनुभवत असतो.त्याचे वाहक असतो आणि त्याचे निरीक्षक सुद्धा असतो. लिंगभाव समानतेच्या दृष्टिकोनातून आपण जेव्हा या लिंग आधारित भेदभावाला पाहतो, समजून घेतो आणि त्यात समतेच्या दृष्टिकोनातून बदल घडविण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा हा प्रयत्न व्यक्तिगत असतोच तसाच तो सामाजिकसुद्धा असतो. याच बदलाला किंवा ज्याला आपण परिवर्तन म्हणत आहोत. त्याला एक व्यक्तिगत रूपातून सामाजिक स्वरूप यावे, म्हणून हा उत्सव समतेचा उपक्रम हा गाव पातळीवर करायला हवा. त्यामुळे गावातील सर्व स्तरावरील लोकांना याची व्यक्तिगत पातळीवर जाणीव होईल आणि समाजामध्ये समतेच्या दृष्टिकोनातून एक नवीन गाव/समाज तयार होईल. जो समानतेचा विचार करेल आणि त्यानुसार गावामध्ये जाणीवपूर्वक बदल घडविण्याचा प्रयत्न करेल.

'फेअर' म्हणजे 'जत्रा' असे ठिकाण जिथे गावातील प्रत्येक समुदाय यामध्ये सहभागी होतो. गावातील जत्रा म्हणजे वेगवेगळे स्टॉल्स, खेळ, मनोरंजनाचे कार्यक्रम आणि विविध प्रकारचे खाऊ, गावातील लोकांची वर्दळ, आनंदाचे वातावरण... याच संकल्पनेवर आधारित विचार करून 'जेंडर फेअर' किंवा 'उत्सव समते'चा या कार्यक्रमाची रचना केली गेली. गावात अशी जत्रा आयोजित केली जाईल, जिथे गावातील किशोरवयीन मुले–मुली, त्यांचे पालक, शिक्षक, गावातील यंत्रणा, महिला हे सर्व एकत्र येतील आणि वेगवेगळे खेळ, संवाद, चर्चा, चित्रपटांचे शो, पुस्तकांचे वेगवेगळे स्टॉल आणि विविध उपक्रम असतील. ज्यामध्ये ही सर्व मंडळी खेळांचा आनंद घेतील आणि त्याच वेळी लिंगभाव समजून घेतील. तसेच या प्रक्रियेतून शिकून स्वतः, आपले घर आणि मग गाव या क्रमाने लिंगभाव संवेदनशील बदल करण्यासाठी तयार होतील.

मुळातच लिंगभाव किंवा जेंडर हा मुद्दा समजून घेण्यासारखा आहे; परंतु त्यापेक्षाही जास्त तो आपल्या दैनंदिन जीवनात वागण्याचा आहे. आपण आपल्या दैनंदिन जीवनात तो अंगीकारल्याशिवाय आपल्याला त्याचा प्रत्यय येणार नाही. त्याप्रती संवेदनशील होण्याची प्रक्रिया निरंतर चालणारी आहे. पण यामधील महत्त्वाची बाब म्हणजे, ज्या कोणी व्यक्ती हे दैनंदिन जीवनात अमलात आणतील त्यांना मदत करणारी यंत्रणा असणे आवश्यक आहे, जी त्यांच्या घरात, पाड्यात, गावात त्यांना पाहिजे तेव्हा ती उपलब्ध असेल. जर का ही मदत करणारी यंत्रणा नसेल तर हे सर्व काम परत मागे जाण्याची शक्यता दाट आहे. म्हणून गावातील व्यक्ती, समुदाय आणि गावातील यंत्रणा यांची या बाबतीतली समज वाढवून त्यांना संवेदनशील करून, त्यांची जबाबदारी आणखी वाढविण्याची गरज आहे. यासाठी आपल्याला हा 'जेंडर फेअर' गाव आणि वस्ती पातळीवर करणे आवश्यक आहे.

म्हणूनच याला आपण नाव दिले आहे 'उत्सव समतेचा!'

या 'उत्सव समतेच्या' जत्रेचे प्रमुख आयोजक हे आपल्या गावातील गावकरी, मुले आणि शाळेमधील शिक्षक असतील. या सर्वांच्या नंतर येते या सर्व प्रक्रियेला मदत करणारी, सोबत राहणारी संस्था/संघटना. कार्यक्रमाच्या आयोजनात भागीदार संस्थांच्या प्रेरक/सूत्रधारांबरोबरच गावातील यंत्रणा आणि मुलेही महत्त्वाची भूमिका बजावतील. लिंगभाव समानतेच्या चिकित्सक सत्रामधून गेलेली किशोरवयीन मुले आपापल्या गावातील 'उत्सव समतेचा' (जेन्डर फेअर) या कार्यक्रमाच्या आयोजनात सहभागी होतील.


**राहूल रेखावार (भा.प्र.से.)**

संचालक

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,

महाराष्ट्र, पुणे.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १) | उत्सव समतेचा – रचना, उद्दिष्टे | १ |
| २) | उत्सव समतेचा – पूर्वतयारी | ३ |
| ३) | कार्यक्रमाचे नियोजन | ५ |
| ४) | उत्सव समतेचा – उपक्रम १ | ६ |
| ५) | उत्सव समतेचा – उपक्रम २ | १४ |
| ६) | उत्सव समतेचा – उपक्रम ३ | १८ |
| ७) | परिशिष्टे – १ ते ८ | २१ |




# १. उत्सव समतेचा - रचना, उद्दिष्टे

## १.१ उत्सव समतेचा : रचना

'उत्सव समतेचा' (जेन्डर फेअर) याची रचना ही मुख्यतः तीन टप्प्यांत आहे.

**पहिला टप्पा :** हा टप्पा मुख्यतः जाणीव जागृतीचा असेल. यामध्ये अंमलबजावणीची प्रमुख जबाबदारी ही त्या गावात काम करणारी संस्था/संघटना यांची असेल. हे पहिले वर्ष असल्याने यामध्ये अधिक पुढाकाराने काम करण्याची गरज आहे. यामध्ये मुले/पालक/महिला हे सोबत राहतील आणि समजून घेतील.

**दुसरा टप्पा :** यामध्ये स्थानिक ग्रामस्थ, महिला आणि मुले हे आयोजनाच्या प्रक्रियेत सहभागी होतील. या टप्प्यावरती गावातील मुले पहिल्या टप्प्यामधून झालेल्या जाणीव जागृतीमधून खेळाच्या आनंदासोबतच जे लिंगभावाचे संदेश आहेत त्यावर अधिक विचार करतील, त्याचप्रमाणे स्वतःच्या आयुष्यातील परिस्थितीशी त्याचा सांधा जुळवून पाहतील. गावात लिंगभाव समानतेचे वातावरण निर्माण करण्यासाठी गावातील लोक पुढाकार घेतील, अशा व्यक्ती शोधून योग्य पद्धतीने त्यांना त्यासाठी तयार केले जाईल.

**तिसरा टप्पा :** या टप्प्यात गावातील यंत्रणा, तरुण, मुले, महिला ही सर्व या कार्यक्रमाचे नेतृत्व करतील. संस्था/संघटना यांची भूमिका फक्त सोबत असण्याची असेल. उर्वरित सर्व जबाबदाऱ्या या गावातील लोक, यंत्रणा, तरुण, मुले आणि महिला यांची असेल. या टप्प्याला समतेच्या उत्सवामधल्या विविध कार्यक्रमांच्या माध्यमांतून लिंगभाव असमानता यावर मंथन होऊन समानतेच्या दिशेने विचार व कृतीचा प्रवास सुरू होईल.

तसेच सामाजिक अलिखित नियमांवर मंथन होईल आणि त्यावर घर, वस्ती, यंत्रणा इत्यादी पातळीवर चर्चा होईल. ही सर्व प्रक्रिया समानता, स्वातंत्र्यता, बंधुता आणि न्यायिक मूल्यांची जपणूक करणारी असेल.

## १.२ यांतून काय साध्य होईल?

- गावात लिंगभाव समानता यावर जाणीव जागृती निर्माण होईल.
- गाव पातळीवर लिंगभाव समतेसाठी प्रयत्न करणारे गट किंवा यंत्रणा यांना बळ देणारा मदत गट तयार होईल.



## १.३ उत्सव समतेचा उद्देश :

- पालक, ग्रामस्थ आणि गावातील यंत्रणा यांच्यामध्ये मुलांवर होणारा भेदभाव आणि मुलांचे अधिकार यावर जागृती करणे.
- पालक, ग्रामस्थ आणि गावातील यंत्रणा त्यांच्या लैंगिक अधिकारांची व अस्तित्वात असलेल्या भेदभावांची जाणीव निर्माण करणे.
- गावातील महिला आणि मुलांना व मुलींना लिंग आधारित भेदभाव व अत्याचाराविरुद्ध आवाज उठवण्यास प्रोत्साहित करणे.
- ३ वर्षांमध्ये पालक, ग्रामस्थ आणि गावातील यंत्रणा यांच्यामध्ये लिंग आधारित होणारा भेदभाव याची जाणीव आणि गावामध्ये भेदभाव होणार नाही, यासाठी वातावरणनिर्मिती तयार करून त्यावर कृती कार्यक्रम तयार करणे.

## १.४ समारोप :

हा उत्सव गमतीशीर, परंतु त्याचबरोबर जनसंवाद सुरू करण्याचा एक प्रभावी मार्ग आहे. ‘उत्सव समते’चा ही अशीच एक प्रक्रिया आहे, याची मदत गावातील जास्तीत जास्त लोक, विद्यार्थी व त्यांचे पालक तसेच शाळेतील शिक्षकांपर्यंत पोहोचण्यास होईल. त्यांना बोलण्यास आणि एकत्र चर्चा करण्यासाठी आणि आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी हा उत्सव उपयुक्त ठरेल. असे वातावरण या उत्सवाच्या माध्यमातून निर्माण होईल.

अशा प्रकारच्या उत्सवाची आखणी करण्यासाठी तुम्हांला या मार्गदर्शिकेची मदत होईल, असा विश्वास आहे.

> कृतीशिवाय कल्पना म्हणजे केवळ स्वप्नच आहे, कल्पनेशिवाय कृती म्हणजे वेळेचा अपव्यय आहे, परंतु कल्पना व कृतीने तुम्ही जग बदलू शकता. ‘’
>
> **नेल्सन मंडेला**

◆◆◆



# २. उत्सव समतेचा - पूर्वतयारी

**पूर्वतयारी :**

**२.१ या उत्सवात हाताळल्या जाणाऱ्या मुद्द्यांविषयी पुरेशी माहिती आपल्याजवळ आहे का?**

गाव पातळीवरील आयोजक गटांसोबत या कार्यक्रमाचा उद्देश, त्याची रचना आणि त्याचे आयोजन या संदर्भात गटचर्चा करणे गरजेचे आहे.

वरील मुद्द्यांना अनुसरून चर्चा घडविण्यासाठी शाळेतील पुढाकार घेणारी मुले आणि शाळा व्यस्थापन समिती/शिक्षक आणि गावातील नेतृत्व करणाऱ्या महिला, युवा यांच्यासोबत गटामध्ये चर्चा करण्यासाठी खालील प्रश्नावलीचा वापर करावा.

- आपण आपल्या गावात उत्सव समतेचा का करायचा?
- हा उत्सव कसा असायला हवा? या उत्सवात काय काय असायला हवे?
- उत्सवामध्ये कोणाकोणाला बोलवायचं?
- उत्सवामध्ये आपण कोणत्या विषयांना घेऊन चर्चा करू शकतो?
- या उत्सवाच्या कोणकोणत्या उपक्रमांची जबाबदारी कोण कोण घेईल?
- गावातील इतर कोणत्या लोकांना आपण बोलावू शकतो? त्यांचा यामध्ये कसा सहभाग आपण घेऊ शकतो?
- शाळेतील नेतृत्व गटातील मुलांची/मीना राजू मंच गटामधील मुलांची आणि शाळा व्यवस्थापन समिती, शाळा आणि ग्रामपंचायत यांची काय जबाबदारी असेल?

**२.२ गावामध्ये लोकांना उत्सव समतेचा या उपक्रमाची माहिती देणे :**

उत्सव समतेचा हा उपक्रम शाळा आणि गाव केंद्रित असल्यामुळे विद्यार्थ्यांसोबत, शाळेच्या शिक्षकांसोबत व मुख्याध्यापकांसोबत बैठक घेऊन पुढील नियोजन करणे गरजेचे आहे. शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांकडून औपचारिक परवानगी मिळवणे आवश्यक आहे. शाळेतील प्रत्येक घटक उत्साहाने सहभागी होणे, हे उत्सवाच्या यशासाठी खूप महत्त्वाचे आहे.

त्याचप्रमाणे गावातील यंत्रणा आणि इतर नागरिक, पालक यांच्या सोबतसुद्धा संवाद साधून गावातील वातावरण तयार करणे अतिशय महत्त्वाचे आहे आणि त्या पद्धतीने आपण साधारणता १५ ते २० दिवस अगोदर गावातील सर्व यंत्रणांच्या सोबत त्यांचा कशा पद्धतीने सहभाग असेल, यावर संवाद तसेच चर्चा करणे अपेक्षित आहे.



जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना उत्सवाच्या पूर्वतयारीत सहभागी करून घेता यावे, म्हणून शाळेतील परिपाठाची वेळ निवडून उत्सवाची माहिती द्यावी. सूचना फलकावर लावता येऊ शकेल, अशी थोडक्यात सूचना बनवावी आणि गावातील लोकांसोबत बोलण्यासाठी विद्यार्थ्यांच्या मदतीने गावातील पालक आणि इतर लोकांपर्यंत या बद्दलची माहिती पोहचवावी.

### २.३ कार्यक्रम नियोजनाची पूर्व बैठक :

शाळा किंवा गाव या ठिकाणी मोहीम घेण्यासाठी आवश्यक जागा शोधावी. उत्सव समतेचा हा उपक्रम गावामधील सर्व लोक येतील अशा ठिकाणी घेणे आवश्यक आहे आणि त्यामध्ये गावामधील सर्व घटकांचा समावेश असणे व आयोजक म्हणून आपण गावामधील जबाबदार व्यक्तीसोबत चर्चा करणे गरजेचे आहे.

प्रत्येक कृती करण्याच्या सविस्तर प्रक्रिया ठरवून त्या कागदावर लिहून घेणे गरजेचे आहे. यामुळे मोहिमेच्या अगोदर, दरम्यान व संपल्यावरच्या कामांची यादी बनवावी. काही कामे पुढीलप्रमाणे :

- **निमंत्रण पत्रिका बनवणे :** शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत, पालक इत्यादींसाठी.
- प्रत्येक कृती कशी केली जावी, कोणते प्रश्न विचारले पाहिजेत, कोणत्या संदेशावर भर दिला पाहिजे यांविषयी प्रेरकासाठी सूचनापत्रक बनवणे.
- सर्व आवश्यक साहित्यांची यादी (चेकलिस्ट) बनवणे.
- पोस्टर्स व बॅनर्स बनवणे आणि गटातील सदस्यांसाठी कामे नेमून देणे.
- **आवश्यक साहित्य :** या कृती करून घेण्यासाठी लागणाऱ्या सर्व आवश्यक साहित्यांची यादी बनविण्यात यावी. यापैकी बरेचसे साहित्य हे साधे, सहज मिळणारे व स्वस्त आहे. उदा. विविध स्पर्धा घेण्यासाठी चार्ट पेपर, स्केच पेन्स, कागद व पेन्स, शक्यतो सापशिडीचा खेळ मोठ्या कापडावर छापून घेणे (ते शक्य नसल्यास साधी सापशिडी वापरावी आणि सापाचे तोंड व शिडीचा पाया असलेल्या अंकांची लिंगसमभाव संदेश/विधाने लिहिलेली कार्डे सोबत ठेवावीत.)
- **भूमिका व जबाबदाऱ्या :** कामे नेमून देण्यासाठी प्रत्येक सदस्याला तो/ती काय करू शकते हे विचारणे महत्त्वाचे आहे. त्यांच्या आवडीनुसार व कौशल्यांनुसार कोणत्या जबाबदाऱ्या स्वीकारणे त्यांना आवडेल, हे त्यांनी सुचवावे. जबाबदारी घेतलेल्या व्यक्तीचे नाव यादीतील प्रत्येक कामाच्या पुढे लिहिलेले असावे.
- **वेळेची मर्यादा :** सर्व तयारी वेळेत व्हावी, यासाठी टीम म्हणून प्रत्येक कामासाठी वेळेची मर्यादा ठरवली पाहिजे.



# ३. कार्यक्रमाचे नियोजन

## ३.१ उत्सवाची अंमलबजावणी :

उत्सव समतेचा या दिवशी सर्व सहभागी गावाच्या परिसरातील मोकळ्या जागेत एकत्र जमतील. विविध रंगांमधील बॅनर्स व पोस्टर्सनी आणखी चमक येईल. उत्सव समतेच्या कार्यक्रमात वेगवेगळ्या प्रकारचे स्टॉल्स असतील, ज्यामध्ये गावातील सर्व लोक गटांनी किंवा घोळक्याने एका उपक्रमाकडून दुसऱ्या उपक्रमाकडे जातील. पोस्टर्स, खेळ, वैगरे.

या प्रक्रियेमध्ये पोस्टर्स व स्लोगन विद्यार्थ्यांच्या सहभागातून तयार करावेत. या सर्व गोष्टी प्रदर्शनीय ठिकाणी ठेवाव्यात. सापशिडीसारख्या मैदानी खेळांनी व विविध स्पर्धांनी सुद्धा बऱ्याच ग्रामस्थांना आणि पालकांना आकर्षित केले जाईल. ग्रामस्थ आणि पालकांना खेळात सक्रिय सहभागी करून घेत असतानाच ते लिंगभाव आणि अत्याचाराच्या मुद्द्यांवरील चर्चेमध्ये सहभागी होतील, त्यांची मते व विचार प्रकट करतील, याची खात्री प्रत्येक प्रेरकाने करून घेणे गरजेचे आहे.

◆◆◆



# ४. उत्सव समतेचा - उपक्रम १

गावामधील सर्व ग्रामस्थ, महिला, समिती मधील सदस्य, ग्रामपंचायत सदस्य आणि मुले हे सर्व गावातील ठरलेल्या ठिकाणी, म्हणजे जिथे उत्सव समतेचा हा उपक्रम होणार आहे त्या ठिकाणी जमतील. प्रेरक आणि इतर मदतनीस प्रभात फेरी या प्रथम कृतीमधून उत्सवाला सुरुवात करतील. घोषणा देत गावातील सर्व लोकांना या उत्सवामध्ये सामील होण्यास प्रोत्साहित करतील.

## प्रभातफेरी/गावफेरी

**उद्देश :** प्रभातफेरीच्या माध्यमातून गावातील प्रत्येक घरात लिंगसमभाव उत्सव समतेचा याबाबत जागृती करणे.

**आवश्यक साहित्य :** घोषणा फलक.

**सहभाग :** विद्यार्थी, शिक्षक आणि शाळा व्यवस्थापन समिती.

**वेळ :** सकाळी ८ वाजता किंवा सायंकाळी ५ वाजता.

**प्रक्रिया :** शाळेतील मुलांना फेरीची कल्पना देऊन ठेवणे आणि 'मीना राजू मंच' गटामधील नेतृत्व करणाऱ्या मुलांना जबाबदारी देणे. शाळा व्यवस्थापन पदाधिकाऱ्यांना फेरीबद्दल माहिती देणे आणि मुलांची जबाबदारी म्हणून सरपंच या सर्वांना सांगून शाळेतील किंवा गावामधील चौकात एकत्र येऊन, फेरीस सुरुवात करणे.

शक्य असेल तितक्या गावातील सर्व वस्त्यांवर फेरी घेऊन जाणे. सर्व मुलांनी मिळून समानतेच्या घोषणा देऊन गावात जनजागृती करणे आणि त्यांनतर ठरलेल्या जागी फेरीचा समारोप करणे व त्यानंतर पुढील कार्यक्रमास सुरुवात करणे.

**सूचना :** प्रभात फेरी घोषणावाक्य परिशिष्ट १ मध्ये जोडली आहेत.

### ४.१ रांगोळी स्पर्धा :

**उद्देश :** संस्कृती आणि खेळ यांच्या माध्यमातून लिंगभावाची समज मुले आणि गावकऱ्यांमध्ये तयार करणे.

**रांगोळी स्पर्धेतील विषय :**

- प्रत्येक मूल एकसमान (Inclusion of all Gender)
- शिक्षणाची गरज प्रत्येक मुलाला (Inclusion of all Gender)
- हिंसेचा विरोध करा.



- बालअधिकार
- बालकायदे
- महिला अत्याचार

**प्रक्रिया :**

या स्पर्धेसाठी गावातील अशा ठिकाणी जागा पाहावी जिथे सर्व सहभागी एकाच वेळी रांगोळी स्पर्धेसाठी सहभाग घेतील. या स्पर्धेमध्ये गावातील मुले, शाळा व्यवस्थापन समिती, गावातील इतर लोक सहभाग घेऊ शकतात आणि वरील विषयांवर रांगोळ्या काढू शकतात. परंतु रांगोळी ही कला मुख्यतः मुली व स्त्रियांची मानली गेल्याने, गावातील मुलांना व पुरुषांना या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आवर्जून प्रोत्साहित करावे. कारण रांगोळी काढणे ही एक कला आहे आणि सरावाने कोणीही उत्तम प्रकारे ती काढू शकतो.

रांगोळी काढून झाल्यावर सर्व सहभागींचे अभिनंदन करावे आणि त्यांना इतर खेळांमध्ये सहभागी होण्यास सांगावे.

## ४.२ चित्रकला स्पर्धा – विद्यार्थी आणि इतर वयस्क :

**उद्देश :** चित्रांच्या माध्यमातून गावकरी आणि मुलांमध्ये लिंग आधारित भेदभाव याची समज तयार करणे.

**आवश्यक साहित्य :** कार्ड पेपर, रंग पेटी, स्केच पेन्स इत्यादी.

**चित्रकला स्पर्धेसाठीचे विषय :**

- प्रत्येक मूल एकसमान (Inclusion of all Gender)
- शिक्षणाची गरज प्रत्येक मुलाला (Inclusion of all Gender)
- हिंसेचा विरोध करा.

**प्रक्रिया :**

साधारणतः वरील विषयांना घेऊन इच्छुक सहभागींना चित्र काढण्यास सांगावे. सर्व सहभागी एकाच वेळी या स्पर्धेमध्ये सहभाग घेतील याची खात्री करून घ्यावी. सहभागींना चित्र काढण्यासाठी आवश्यक त्या सूचना द्याव्या. चित्र काढून झाल्यावर सर्व सहभागींचे अभिनंदन करावे आणि त्यांना इतर खेळांमध्ये सहभागी होण्यास सांगावे.

## ४.३ खुलजा सीम सीम – वादविवाद

**उद्देश :** खेळाच्या माध्यमातून ग्रामस्थ आणि मुलांमध्ये लिंग-आधारित भेदभावाला घेऊन चर्चा घडवून आणणे.

**आवश्यक साहित्य :** विधान आणि फ्लिप कार्ड, स्पंज बॉल आणि बाक

**सहभागी :** ग्रामस्थ आणि विद्यार्थी

**प्रक्रिया :**

हा खेळ साधारणतः जास्तीत जास्त ६ ते ८ सहभागींसोबत खेळला जावा. सहा (किंवा अधिक) विधाने वेगवेगळ्या फलकावर लिहिली जावी व आवरणाखाली (दुसऱ्या कागदाने) झाकावी. नेम धरून फळ्यावर चेंडू मारावा. ज्या फलकाला चेंडू लागेल त्या फलकावरील आवरण काढावे. सहभागी असलेले ते विधान मोठ्याने वाचतील. प्रेरक त्यांना त्या विधानाबाबत त्यांची मते व आकलन विचारतील. मांडलेल्या मतांना खोडण्यासाठी विरुद्ध मते मांडण्यास सांगितले जाईल. चर्चेदरम्यान प्रेरकसुद्धा वादासाठी एखादे वाक्य सांगतील. वादविवादाच्या शेवटी प्रेरक पुढीलप्रमाणे समारोप करतील – पुरुषांच्या व स्त्रियांच्या भूमिका सामाजिक दृष्टिकोनातून बनवल्या जातात. हानिकारक तसेच अडचणीच्या भूमिकांना आव्हान करून त्या बदलल्या पाहिजेत.

**सूचना :** 'खुल जा सीम सीम'ची विधाने परिशिष्ट क्रमांक २ मध्ये जोडली आहेत.

## ४.४ लघुचित्रफीत

**उद्देश :** लघुचित्रफितीच्या माध्यमातून समाजाची लिंग-आधारित भेदभाव या विषयाला घेऊन चर्चा करणे.

**आवश्यक साहित्य :** टीव्ही, स्पीकर, पेन ड्राइव्ह आणि वर्ग खोली (जिथे व्यवस्थित काळोख होऊ शकतो) गरज भासल्यास माइक.

**सहभागी :** ग्रामस्थ व पालक

**कालावधी :** ३० मिनिटे

**प्रक्रिया :**

सर्वांचे स्वागत करावे व विषयाची संबंधित चित्रफीत दाखवावी. कार्यक्रमाची माहिती आणि लघुचित्रफीतचा विषय समजावून सांगावा. त्यानंतर लिंगभाव, असमानता किंवा लिंगभाव याविषयावरची निवडलेली लघुचित्रफीत दाखवावी. त्यानंतर लघुचित्रफितीवर आधारित चर्चा खालील प्रश्नांच्या मदतीने घडवून आणावी.

**चर्चेसाठी प्रश्न :**

- ही चित्रफीत कशी वाटली. यातील दृश्यांवर किंवा एकंदरीत लघुचित्रफितीवर प्रतिक्रिया जाणून घेणे.

- कोणती चरित्रे/दृश्ये लिंगभाव वरील भेदभावांवर आधारित होती?
- चित्रफितीतील काही घटना/दृश्ये आपल्या घरात होत असतात का? उदा. काही कामे फक्त स्त्रियांनीच करावीत का? इत्यादी.
- चित्रफितीमधील विषय आपण आपल्या घरात किंवा समाजात बघतो का?
- लिंगभावावर आधारित असमानता, भेदभाव समूळ नष्ट करण्यासाठी आपण व्यक्तिगत आणि सामूहिकरीत्या काय करू शकतो?

## ४.५ सेल्फी

**उद्देश :** सेल्फी फोटो सोबत समानता सांगणारे विधान यांच्या सोबत सेल्फी घेणे.

**आवश्यक साहित्य :** सेल्फी स्टँड आणि कॅमेरा किंवा स्वत:चा मोबाइल.


**प्रक्रिया :**

उत्सव समतेचा या मोहिमेत समतेच्या अनुषंगाने उत्सवाच्या प्रवेशद्वाराला सेल्फी स्टँड उभे करावे. या स्टँडवर समतेच्या दृष्टिकोनातून संदेश लिहिलेला असावा. सकारात्मक विधान असलेले सेल्फी प्रवेशद्वाराजवळ लावून उत्सवाला आलेल्या प्रत्येक व्यक्तीचा फोटो काढावा आणि स्टँडला ठेवायला सांगावा.

**सेल्फी स्टँडची विधाने :**

- मी समतावादी आहे.
- तुम्ही दिलेले कार्य आम्ही पुढे घेऊन जात आहोत.
- मी माझ्या गावात बालविवाह होऊ देणार नाही.
- माझे गाव हिंसाविरहित गाव.

गावातील प्रत्येक व्यक्तीने याच्या समोर उभे राहून फोटो काढावा. सरपंच, इतर सदस्य यांना जाणीवपूर्वक फोटो काढण्यास सांगून याचे गावामधील लोकांना स्टेट्स ठेवायला सांगावे. फोटो काढत असताना सेल्फी स्टँडवरील विधानाबाबत प्रेरकाने फोटो काढून घेणाऱ्या व्यक्तींशी चर्चा करावी.



मैदानी खेळ

## ४.६ सापशिडीचा खेळ

**उद्‌देश :** सापशिडी या खेळाच्या माध्यमातून लिंग–आधारित भेदभावाबद्‌दल चर्चा करणे.

**आवश्यक साहित्य :** सापशिडी आणि ठोकळा

**सहभागी :** ग्रामस्थ आणि विद्यार्थी

**प्रक्रिया :**

सापशिडीचा हा खेळ आपल्या नेहमीच्या सापशिडीच्या खेळावरून घेतलेला आहे. आपल्या नेहमीच्या सापशिडीच्या खेळात एका बोर्डवर १ ते १०० असे चौकोन असतात. त्यावर काही चौकोनांना जोडणाऱ्या शिड्या असतात. ज्यांच्या मदतीने खेळाडू खेळत लवकर पुढे जातो/जाते. त्याचप्रमाणे यात काही चौकोनांना जोडणारे साप असतात, ज्यांच्यामुळे वर सरकणारा खेळाडू खाली घसरू शकतो. हा खेळ दोन किंवा अधिक खेळाडू फास्यांच्या साहाय्याने खेळतात. १०० या चौकोनात आधी पोहोचणारा/पोहोचणारी खेळाडू जिंकतो/जिंकते.

आपल्या या खेळात आम्ही 'शिड्या' सकारात्मक संदेश देण्यासाठी वापरल्या असून साप हे लैंगिकतेवर आधारित असमान रूढी–नियमांवर भर देण्यासाठी वापरले गेले आहेत. उदा. मुलींना शिक्षणाची समान संधी देणे. हा संदेश असणाऱ्या चौकोनात शिडी आहे, तर घरकाम ही मुख्यतः मुलींची जबाबदारी आहे. हा संदेश असणाऱ्या चौकोनात साप आहे. हा खेळ अधिक रंजक बनवण्यासाठी हा खेळ ८ ते१० फुटाच्या मोठ्या कापडावर छापला जावा; जेणेकरून खेळताना खेळाडू स्वतःच्या त्या त्या चौकोनात उभे राहतील, परंतु मोठ्या शिडीचा खर्च करणे शक्य नसेल तर नेहमीच्या छोट्या सापशिडीवर हा खेळ खेळावा आणि शिडीचा पाया आणि सापांची तोंडे येथे जे अंक येतील, त्या अंकांची कार्डे करून त्यावर सकारात्मक व नकारात्मक विधाने लिहावीत. त्या नंबरवर खेळाडू आला/आली की त्या नंबरचे कार्ड उघडून त्यात लिहिलेले विधान वाचावे.

खेळादरम्यान एखादा खेळाडू सापाच्या किंवा शिडीच्या चौकोनात गेल्यावर त्यावरील संदेश वाचून दाखवतात व प्रेरकांनी त्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतात. त्या त्या संदेशाविषयी समान समज निर्माण व्हावी, यासाठी इतर खेळाडूंनी व खेळ बघणाऱ्या विद्यार्थ्यांनी सुद्धा चर्चेमध्ये भाग घ्यावा. एक खेळाडू जिंकण्याच्या चौकोनात पोहोचेपर्यंत खेळ सुरू असतो.



इथे देखील लिंगभावाबद्दल विधाने तयार करून सापशिडीवर प्रिंट करायची आहेत. सकारात्मक आणि नकारात्मक (सकारात्मकतेसाठी शिडी आहे आणि नकारात्मकतेसाठी साप आहे.)

**सूचना :** सापशिडीची विधाने परिशिष्ट क्रमांक ३ मध्ये जोडली आहेत.

## ४.७ रोल प्ले

**उद्देश :** समाजामध्ये होणाऱ्या लिंग–आधारित भेदभावाचा विषय नाटकाच्या माध्यमातून गावासमोर मांडणे.

**आवश्यक साहित्य :** माईक, वेशभूषा, नाटकाचे स्क्रिप्ट आणि नाटकासाठी लागणारे आवश्यक साहित्य इत्यादी.

**सहभागी :** मुले

**प्रक्रिया :**

शाळेमधील लिंगभाव समानता या उपक्रमामधून मुलांमध्ये झालेल्या एकूण सामाजिक विषमतेवरील विषयांवर (जसे – बालविवाह, बालमजुरी, बाललैंगिक शोषण) मुले नाटकाच्या माध्यमातून सादरीकरण करतील. नाटकाच्या सादरीकरणानंतर प्रेरकाने गावातील लोकांसोबत या विषयाला घेऊन संवाद साधण्यासाठी चर्चा घडवून आणावी.

## ४.८ चळवळीची गाणी

**उद्देश :** लिंग–आधारित भेदभाव दर्शविणाऱ्या गाण्यांच्या माध्यमातून चळवळीची गाणी गाऊन समाज प्रबोधन करणे.

**आवश्यक साहित्य** : डफ, खंजिरी, माईक इत्यादी आणि चळवळीच्या गाण्यांची पुस्तके.

**प्रक्रिया :**

समाज बदलासाठी आपल्या पारंपरिक भाषेत बदलाच्या भूमिका वेगवेगळ्या पद्धतीने पुरोगामी विचारांच्या व्यक्तींनी मांडल्या आहेत. आपल्या समाजातील शाहिरांनी सुद्धा लोकांना समजेल अशा भाषेत समाजाचे चित्र कसे आहे, ते कसे असावे आणि समाज बदलाची भूमिका काय असावी हे आपल्या कवितेतून, गाण्यातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. प्रेरक म्हणून आपण सुद्धा या गोष्टी समजून घेणे आणि गाव पातळीवर गावातील लोकांना समजेल अशा भाषेत त्यांना गाण्याच्या माध्यमातून लिंगभाव समानतेच्या दृष्टिकोनातून जनजागृती करणे आवश्यक आहे. त्यासाठी समतेच्या उत्सवात चळवळीची गाणी सादर केली जातील आणि गावकऱ्यांनाही त्यात सहभागी करून घेतले जाईल.

**सूचना :** चळवळीची गाणी परिशिष्ट क्रमांक ४ मध्ये जोडली आहेत.



## ४.९ संगीत खुर्ची

**उद्देश :** खेळाच्या माध्यमातून गटामध्ये लिंग–आधारित भेदभावाबाबत चर्चा करणे.

**आवश्यक साहित्य :** खुर्च्या आणि कागदावर लिखित विधान, साउंड आणि माईक इत्यादी.

**सहभागी :** ग्रामस्थ आणि विद्यार्थी

**प्रक्रिया :**

संगीत खुर्ची हा खेळ सामान्यतः उत्सवाच्या दिवशी खेळला जाणारा खेळ म्हणून प्रचलित आहे. या खेळामध्ये जास्त प्रमाणात महिलांचा समावेश दिसून येतो, परंतु समतेच्या उत्सवात पुरुषांनाही हा खेळ खेळायला प्रोत्साहन दिले जाईल. या खेळामध्ये स्पर्धा असल्यामुळे यामध्ये जिंकण्याची भावना निर्माण करते.

सदर खेळामध्ये मैदानात खुर्च्या एका ओळीत मांडल्या जातील. आपण प्रत्येक खुर्चीच्या मागे विधान लिहून ठेवावे व त्याला दुसऱ्या कागदाने झाकावे. जेव्हा खेळ सुरू होईल, तेव्हा गाण्याचा आवाज येईल. सहभागी खुर्च्यांभोवती पळतील आणि जेव्हा गाणे बंद होईल तेव्हा सर्व आपापली जागा निवडतील. जेव्हा शेवटची व्यक्ती बसेल तेव्हा त्या व्यक्तीने त्या खुर्चीच्या मागे लिहिलेले विधान मोठ्याने वाचून दाखवावे व त्यावर पुढील गटात चर्चा करावी. प्रेरक म्हणून आपल्याला या सर्व विधानांवर अभ्यास करणे महत्त्वाचे आहे आणि त्याच बरोबर गटामध्ये या विधानाला घेऊन गावातील लोकांसोबत चर्चा करणे आणि त्याचे निष्कर्ष गटामधून चर्चेच्या माध्यमातून काढून घेणे.

यानंतर शेवटी बसलेल्या व्यक्तीला बाद म्हणून घोषित करावे आणि ती खुर्ची काढून घ्यावी.

**सूचना :** संगीत खुर्चीची विधाने परिशिष्ट क्रमांक ५ मध्ये जोडली आहेत.

## ४.१० अडथळा शर्यत

**उद्देश :** घरातील कामांच्या बाबतीत होणाऱ्या लिंग–आधारित भेदभावाबद्दल खेळाच्या माध्यमातून जागृती करणे.

**आवश्यक साहित्य** : साड्या, सुई–दोरा, फुटबॉल, शर्ट, डाळी, बटाटा, खिळा आणि हातोडा इत्यादी.

**कालावधी :** साधारणतः प्रत्येक खेळासाठी ५ ते ७ मिनिटे.

**प्रक्रिया :**

हा खेळ स्त्री–पुरुषांनी एकत्र खेळणे अपेक्षित आहे. खेळ खेळण्यासाठी सहभागी स्त्री–पुरुषांना/ मुला–मुलींना एका रांगेत उभे करावे. प्रथम एका ओळीत अस्ताव्यस्त ठेवलेली साडी, त्यापुढच्या टप्प्यावर सुई–दोरा, त्यानंतर हातोडा, खिळा व लाकडी ठोकळा, त्यापुढे पिठाचा गोळा व पोळपाट–लाटणे, मग लेस काढलेला बूट आणि



सगळ्यात शेवटी बॉल अशा पद्धतीने सर्व वस्तू मांडून ठेवाव्यात. सर्व सहभागी प्रथमतः साडीची घडी घालतील. नंतर सुईमध्ये दोरा ओवून शर्टला बटण लावतील. त्यानंतर हातोडा आणि खिळा घेऊन तो एका लाकडी ठोकळ्यामध्ये ठोकतील. त्यानंतर पुढ्यात ठेवलेला पिठाचा गोळा समोर ठेवलेल्या पोळपाटावर ठेवून त्याची गोल पोळी लाटतील. मग पुढे जाऊन बुटामध्ये लेस घालतील आणि सगळ्यात शेवटी बॉलचे टप्पे उडवीत रांगेच्या बाहेर जातील. यामध्ये जी व्यक्ती पहिली येईल तसेच जी व्यक्ती शेवटी येईल, त्यांची प्रतिक्रिया विचारावी. कोणती कृती करणे सगळ्यात सोपे वाटले आणि कोणती कृती करणे सगळ्यात अवघड वाटले हे विचारावे. एखाद्या पुरुषाने पोळी चांगली लाटली असेल किंवा साडीची सहज घडी घातली असेल किंवा एखाद्या स्त्रीने बुटात सहज लेस ओवली असेल तर त्यांना ते कसे जमले हे आवर्जून विचारावे. यांतून कोणतेही काम हे स्त्रियांचे किंवा पुरुषांचे असे नसून ते सरावाने कोणालाही येऊ शकते हे लक्षात येईल.

## ४.११ शपथ

**उद्देश :** लिंग आधारित भेदभाव होणार नाही याची गावकरी म्हणून शपथ घेणे

**आवश्यक साहित्य :** कापडी किंवा फ्लेक्स असलेला साधारणतः ८ बाय १० चा बॅनर बनविणे आणि त्यावर शपथ छापून घेणे, रंग.

**प्रक्रिया :**

प्रत्येक गावात उत्सव समतेचा समारोप करताना गावातील सरपंच, ग्रामसेवक, महिला, पालक, गावातील वरिष्ठ व्यक्ती, अधिकारी आणि मुख्याध्यापक यांच्या अध्यक्षतेखाली शपथ घेऊन समारोप करावा. यापैकी कोणत्याही एका व्यक्तीला शपथ घेण्यास सांगून त्यांच्या मागोमाग उत्सवमधील सर्व सहभागींना शपथ म्हणण्यास सांगावे. सगळ्यात शेवटी या शपथेला समर्थन म्हणून सर्व सहभागींना समोर ठेवलेल्या रंगांमध्ये आपला हात बुडवून आपल्या कोणत्याही एका हाताचा ठसा त्या शपथेखाली उठवायला सांगावे.

**शपथ समतेची**

मी..... या गावातील रहिवासी असून आज अशी शपथ घेतो, की मी सर्व मुलांना व मुलींना समान वागवेन. कोणावरही अत्याचार होणार नाही, याची गावातील एक जागरूक नागरिक म्हणून जबाबदारी घेईन. मी माझे गाव मुलांच्या संरक्षणाच्या दृष्टिकोनातून समानतामूलक करण्याचा सदैव प्रयत्न करेन. माझ्या गावात बालविवाह होणार नाही आणि झाल्यास त्याचा तीव्र विरोध मी करेन. सर्व समस्या कोणाचाही अपमान न करता सोडवेन. सर्व प्रकारच्या अत्याचारांचा व हिंसेचा विरोध मी करेन.

◆◆◆



# ५. उत्सव समतेचा - उपक्रम २

**इनडोअर खेळ :**

## ५.१ नेमबाजी :

**उद्देश :** ‘नेमबाजी’ या खेळामधून लिंग आधारित भेदभावाबद्दल चर्चा करणे.

**आवश्यक साहित्य :** नकली बंदूक. गोलाकार चक्री आणि विधाने (ऑलिम्पिकमधील सुवर्णपदक विजेत्या अंजली भागवत यांचे छायाचित्र लावावे.)

**सहभागी :** ग्रामस्थ आणि विद्यार्थी

**प्रक्रिया :**

साधारणतः आपण गाव असो की शहर, प्रत्येक जत्रेमध्ये हा खेळ पाहिला आहे. या खेळामध्ये गावातील प्रत्येक व्यक्ती सहभागी होऊ शकते. विशेषतः स्त्रियांना यांत सहभागी व्हायला प्रोत्साहन द्यावे कारण हा खेळ मुख्यतः पुरुषांचा म्हणून गणला जातो. एका विशिष्ट अंतरावर एका ठिकाणी एक गोलाकार चक्री लावावी, ज्यामध्ये वेगवेगळ्या रंगांची चक्रं असतील. सहभागींनी नेम धरून बंदुकीचा निशाना धरून त्या गोल चक्रीवर गोळी/बाण मारायचा आहे. ज्या चक्रात नेम लागेल तेथे काही विधाने असतील. त्यातील एका विधानाबद्दल चर्चा करावी. या चर्चेमधून हे लक्षात येईल की, नेमबाजीसाठी एकाग्रता व सराव हे गुण महत्वाचे आहेत. हा खेळ स्त्री व पुरुष दोघेही खेळू शकतात आणि त्याचा लिंगाशी काहीही संबंध नाही.

## ५.२ भावनांचे चक्र :

**उद्देश :** भावना या नैसर्गिक आहेत; परंतु त्या व्यक्त करणे किंवा न करणे यात लिंग आधारित भेदभाव केले जातात, याबाबतची समज निर्माण करणे.

**आवश्यक साहित्य :** लाकडी फळीचे चक्र, काटा किंवा पुठ्ठा, रंग, स्केच पेन्स, विविध प्रकारच्या भावना लिहिलेले कार्डबोर्डचे चक्र (उदा. हसणे, रडणे, लाजणे, राग, रुसणे, दुःख, उदास, क्रौर्य) इत्यादी आणि वर्ग खोली.



**प्रेरकासाठी सूचना :**

- प्रेरकाने नेमलेल्या जबाबदार व्यक्ती किंवा मुलांमधील लीडर्स यांच्या सोबत बसून या खेळाची पूर्व तयारी करून घ्यायची आहे.
- खेळासाठी लागणारे साहित्य आणावे. यामध्ये आपण गावातील कोणाचीही मदत घेऊ शकतो.
- या खेळामध्ये चर्चा कशी करावी, याची तयारी सुद्धा लीडर्सकडून करून घ्यावी.

**प्रक्रिया :**

एका वर्ग खोलीमधील एका भिंतीवर हे भावनांचे चक्र लावावे आणि गावातील लोकांना बोलावून हे चक्र फिरवायला सांगावे. चक्रामधील टोक/बाण ज्या भावनेच्या समोर जाऊन थांबेल, त्या व्यक्तीस ती भावना व्यक्त करण्यास सांगावे. त्यासोबत गटामधील इतर सदस्यांनासुद्धा आपल्या भावना व्यक्त करण्यास सांगून, त्यानंतर गटामधील लोकांना प्रश्न विचारावेत.

या खेळाच्या माध्यमातून आपण आपल्या भावना काय आहेत आणि त्या कशा व्यक्त करायला हव्यात याबाबत चर्चा करावी. आज मला काय वाटले आणि मी ते कसे व्यक्त केले याबाबत सहभागींना व्यक्त व्हायला सांगावे. आपण रोज भावना व्यक्त करत असतो. महिलांना कोणत्या भावना मुक्तपणे व्यक्त करायला वाव असतो आणि कोणत्या भावना व्यक्त करायला बंधने असतात? तसेच पुरुषांना कोणत्या भावना व्यक्त करण्यास वाव असतो व कोणत्या भावना व्यक्त करायला बंधने असतात? याबाबत चर्चा करावी.

**चर्चेचे मुद्दे :**

- भावना व्यक्त करत असताना काय वाटले?
- व्यक्त होताना मनात नेमकी कोणती भावना आली?
- कोणती भावना व्यक्त करण्यास सोपे वाटले?
- कोणती भावना व्यक्त करण्यास अवघड वाटले?
- भावनांचा, स्त्री आणि पुरुष असण्याचा काही संबंध असतो का?
- मोठ्याने कोण हसू शकते? कोण रडू शकते?
- काही भावना फक्त स्त्रियांसाठी आणि काही पुरुषांसाठीच असे असते का? तुम्हांला काय वाटते?



**समारोप** :

आपण दररोजच्या जीवनात वेगवेगळ्या पद्धतीने भावना व्यक्त करत असतो किंवा त्या दाबत असतो किंवा त्यांना काही कारणास्तव रोखून ठेवतो. स्त्रियांनी कोणत्या भावना कशा पद्धतीने व्यक्त कराव्यात आणि पुरुषांनी कोणत्या भावना कशा पद्धतीने व्यक्त कराव्यात याबाबत समाजाने लिंगभावावर आधारित नियम बनवले आहेत. त्यानुसार काही भावना व्यक्त करायला स्त्रियांना मनाई आहे तर काही भावना व्यक्त करायला पुरुषांना मनाई आहे असे मानले जाते. मात्र भावना या सर्वांना सारख्याच असून तिथे स्त्री–पुरुष असा भेदभाव नसतो.

## मैदानी खेळ :

### ५.३ लगोरी :

**उद्देश :** 'लगोरी' या खेळाच्या माध्यमातून महिला आणि मुली यांच्या मधील संकुचित भावना दूर करणे, तसेच खेळाला वय नसते, हे या निमित्ताने सांगणे.

**आवश्यक साहित्य :** दगडी चिपा आणि मोकळे मैदान

**सहभागी :** मुलांचे गट, महिलांचे गट आणि गावकरी

**प्रक्रिया :**

'लगोरी' हा खेळ मेहनतीचा आणि जास्त प्रमाणात पुरुषी खेळ म्हणून ओळखला जातो. या खेळात गावातील मुले–मुली, स्त्री–पुरुष सर्वांना सहभागी करून घ्यावे. लगोरी हा खेळ दोन गटांनी खेळावा; ज्यामध्ये किमान ५ ते ६ मुले/पुरुष आणि ५ ते ६ मुली/महिला सहभागी होतील. या खेळात सर्व दगडी चिपा, मोठ्या खाली व लहान वर याप्रमाणे रचाव्यात. त्याला 'लगोरी' असे म्हणतात. खेळाडू लगोरीवर चेंडू मारतील. चेंडू लगोरीला लागल्यानंतर चेंडू मारणारी टीम ती लगोरी रचेल, तर दुसरी टीम चेंडू मारून लगोरी रचणाऱ्या टीममधील सदस्यांना आऊट करण्याचा प्रयत्न करेल.

**सूचना :** प्रेरकांनी फळ्यावर खालील प्रश्न लिहावेत. खेळ खेळून झाल्यावर खालील प्रश्नांच्या आधारे सहभागींशी चर्चा करावी.

**चर्चेचे मुद्दे :**

- खेळ खेळताना कसे वाटले?
- अगोदर हा खेळ खेळला होता का?

- किती दिवसांनी आपण हा खेळ खेळलात?
- आपण हा खेळ का खेळलो असे वाटते का?

**सूचना :** प्रेरक आणि त्या खेळामधील जबाबदार व्यक्ती म्हणून या खेळामध्ये भांडण होणार नाही याची काळजी घ्यावी. जास्तीत जास्त महिलांना सुद्धा या खेळामध्ये सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करावे.

**समारोप :**

हा एक मैदानी खेळ आहे. मैदानी खेळ शारीरिक सुदृढता यावी आणि आपले शरीर अधिक ताकदीचे व्हावे म्हणून खेळले जातात. खेळामुळे शरीरामध्ये एक प्रकारची सकारात्मक ऊर्जा निर्माण होते; परंतु खेळाला सुद्धा आपण लिंग आधारित करून टाकले आहे. कोणते खेळ कोण खेळणार याचे सुद्धा आपण समाज म्हणून विभाजन केले आहे आणि त्याचे रूपांतर आपण मैदानी आणि घरगुती खेळ यामध्ये पाहत असतो. मैदानी खेळ खेळण्याच्या क्षमता आणि आवड स्त्रियांमध्येदेखील असते. त्यामुळे खेळाला फक्त खेळ म्हणून बघणे आवश्यक आहे.

## ५.४ गुलदस्ता :

**उद्देश :** खेळाच्या माध्यमातून गावातील लोकांसोबत लिंग आधारित भेदभावाबद्दल चर्चा करणे.

**आवश्यक साहित्य :** बादली, स्पंज बॉल आणि विधाने


**सहभागी :** गावातील प्रत्येक व्यक्ती

**प्रक्रिया :**

तीन ते चार लहान बादल्या एका ओळीत ठेवल्या जातील आणि त्यामध्ये काही विधाने लिहिली जातील. एका व्यक्तीने एक छोटा स्पंज बॉल घेऊन त्याचा नेम धरून तो बॉल बादलीमध्ये जाईपर्यंत तो नेम धरून टाकायचा आहे. या खेळासाठी ३ वेळा संधी दिली जाईल. जर व्यक्तीला बादलीत चेंडू टाकता आला नाही, तर पुढील व्यक्तीस संधी द्यावी. जास्तीत जास्त महिलांना या खेळामध्ये भाग घेण्यास प्रवृत्त करावे. जेव्हा चेंडू बादलीत जाईल तेव्हा विधाने वाचून चर्चेला सुरुवात करावी. गटामधील सर्व सहभागींना या चर्चेमध्ये सहभागी करून घेणे अपेक्षित आहे.

**सूचना :** गुलदस्ता या खेळाची विधाने परिशिष्ट क्रमांक ७ मध्ये जोडलेली आहेत.

◆◆◆



# ६. उत्सव समतेचा - उपक्रम ३

**इनडोअर खेळ :**

## ६.१ माझ्या स्वप्नातील गाव :

**उद्देश :** गावातील लोकांनी आणि मुलांनी आपल्या स्वप्नातील अपेक्षित गाव कसे हवे याचे स्वप्न एकत्रितपणे मांडणे.

**आवश्यक साहित्य :** फळा किंवा बोर्ड आणि पेन किंवा मार्कर

**सहभागी :** गावातील लोक

**प्रक्रिया :**

गावातील लोकांनी आणि मुलांनी रिकाम्या फळ्यावर आपल्याला गाव कसे अपेक्षित आहे याचे लिखाण/एका शब्दात करावे किंवा आपले मत मांडावे. ज्यांना लिखाण करता येत नसेल त्यांच्या वतीने आपल्या प्रेरकाने लिहावे किंवा सर्वांनी मिळून गाव कसे हवे याला घेऊन चर्चा करून एक मांडणी करावी. एकूण गावातील लोकांची मांडणी करून झाल्यावर प्रेरकाने काही प्रश्नांना घेऊन चर्चा करावी.

**चर्चेचे मुद्दे :**

- या खेळामधून काय समजले?
- तुम्ही जे स्वप्नातले गाव बघत आहात, ते साकार करण्यासाठी कोणाकोणाची मदत लागणार आहे?
- आणि यामध्ये आपली भूमिका काय असेल?
- स्वप्नातले गाव अस्तित्वात आणणे कठीण आहे की सोपे ?
- या प्रवासात संस्था म्हणून आमची काही मदत लागणार आहे का?

**समारोप :**

स्वप्नातले गाव हा खेळ नसून गावातील लहान थोरांनी बघितलेले स्वप्न आहे, जे नव्याने लोक आपल्या खेळातून पाहत आहेत ही जाणीव प्रेरक म्हणून आपण गावातील प्रत्येक व्यक्तीला करून देणे गरजेचे आहे. यामध्ये लिंग, जात, धर्म, लहान-मोठा, रंग, वर्ग इत्यादी असमानता दर्शविणारे गाव नसून समानतेची वाटचाल करणारे गाव असेल हे अधोरेखित करणे अतिशय महत्त्वाचे आहे.

## ६.२ वादविवाद :

**उद्देश :** गावातील लोकांना हिंसेची व्याख्या स्पष्ट करणे आणि त्याचे प्रकार सांगणे.



**आवश्यक साहित्य :** गोष्टींचे कागद, वर्ग खोली आणि हिंसा आहे, हिंसा नाही, आणि माहीत नाही या लिखाणाचे कागद.

**सहभागी :** गावातील लोक

**कालावधी :** ६० मिनिटे

**प्रक्रिया :**

गावातील व्यक्ती आणि मुले यांना ७ ते ८ गटात विभागावे. प्रत्येक गटाला खाली लिहिलेल्या गोष्टींपैकी एक गोष्ट वाचायला द्यावी. त्यानंतर प्रत्येक गटात प्रस्तुत प्रसंगात हिंसा आहे किंवा नाही आणि असल्यास कोणत्या प्रकारची आहे याबाबत सादरीकरण करण्यास सांगावे व त्यावर चर्चा करावी.

**गोष्टी :**

- कौटुंबिक हिंसा
- मैत्री दबाव
- बालमजुरी
- गावातील प्रथम नागरिक म्हणून जबाबदारी
- महिला म्हणून गावातील वस्त्यांमध्ये विभाजन
- बालविवाह
- भावनिक गुंता
- शिक्षक म्हणून जबाबदारी

**सूचना :** वादविवादामधील गोष्टी परिशिष्ट क्रमांक ९ मध्ये जोडल्या आहेत.

## मैदानी खेळ :

### ६.३ स्लो सायकल :

**उद्देश :** गावातील सर्व लोकांनी स्लो सायकल चालविणे यामध्ये सहभाग घेणे.

**आवश्यक साहित्य :** मोकळे मैदान आणि सायकल

**सहभागी :** गावातील लोक आणि लहान मुले

**कालावधी :** ५ मिनिटे (प्रत्येक राउंडसाठी)

**प्रक्रिया :**

गाव पातळीवर सायकल चालविणे हे सहज पाहण्यात येते आणि मुले आणि मुली हे दोघेही सायकल चालवतात; परंतु एका विशिष्ट वयानंतर मुलींचे सायकल चालविणे बंद होते. स्लो सायकल चालविणे हा खेळ आपण मुले आणि मोठ्या व्यक्ती यांच्यासोबत खेळू शकतो. स्लो सायकल चालविणे ही एक

कला आहे. त्याचा लिंग व वय यांच्याशी काही संबंध नसतो आणि ते सरावाने प्रत्येकाला जमू शकते, हा संदेश यातून मिळणे अपेक्षित आहे.

स्लो सायकल शर्यत जिंकलेल्या खेळाडूला 'तुमचे स्वप्न काय आहे?' असा प्रश्न विचारावा. स्त्री–पुरुष, मुलगा–मुलगी दोघांनाही स्वप्न पाहण्याचा अधिकार आहे, हे यातून लक्षात आणून द्यावे.

## ६.४ सकारात्मक केस स्टोरी :

**उद्देश :** गाव पातळीवरील आणि व्यक्तिगत पातळीवरील झालेल्या बदलांचे फोटो किंवा लेखांचे उत्सवात प्रदर्शन करणे.

**आवश्यक साहित्य :** माउंट बोर्ड, दोरी, फोटो, बदलाच्या केस स्टोरी

**सहभागी :** गावातील सर्व लोक

**प्रक्रिया :**

आपल्या लिंगभाव परिवर्तन प्रक्रियेमध्ये ज्या बदलांच्या केस स्टोरी झाल्या आहेत, त्या केस स्टोरीज्चे पोस्टर्स तयार करावे आणि ते एका मोठ्या दोरीने बांधून त्यांना प्रदर्शनीय ठिकाणी लावावे. तिथे गावामधील एक प्रेरक व जबाबदार म्हणून असतील आणि ते गावातील लोकांना बदलाच्या केस स्टोरीबद्दल माहिती देतील.

## ६.५ लिंबू आणि चमचा :

**उद्देश :** गावातील सर्व लोकांनी लिंग, जात, धर्म, प्रदेश, भाषा हे भेद विसरून एकत्र येऊन या खेळात सहभागी होणे.

**आवश्यक साहित्य :** चमचा आणि लिंबू आणि मोकळे मैदान

**सहभागी :** गावातील सर्व लोक

**प्रक्रिया :**

लिंबू चमचा हा खेळ लहानपणी शाळेमध्ये किंवा अन्य स्पर्धेमध्ये खेळला जाणारा खेळ असून, आपण मोठे झाल्यावर संकोचित होऊन हा खेळ खेळत नाही. त्याचप्रमाणे लिंग, जात, धर्म, प्रदेश, भाषा या अस्मितांमुळे गावातील लोक एकमेकांत मिसळत नाहीत. विशेषतः स्त्रियांच्या शारिरीक हालचालींवरील बंधने तर खूपच वाढतात. त्यामुळे गावातील मुले आणि महिला तसेच पुरुष यांनी हा खेळ एकत्रित खेळावा असे अपेक्षित आहे. त्यासाठी प्रेरकाने सर्वांना प्रोत्साहित करावे. हा खेळ खेळत असताना सर्व गटामधील लोक सहभागी होतील याकडे लक्ष द्यावे.

◆◆◆



# ७. परिशिष्टे - १ ते ८

## परिशिष्ट १ – प्रभात फेरी/गावफेरी घोषणा फलक

- मुलगा–मुलगी एक समान, दोघांनाही शिकवा छान!
- बालिका हो या बालक दोघेही संपत्तीचे मालक.
- प्रेम करायला आई पाहिजे, राखी बांधायला बहीण पाहिजे, लग्न करायला बायको पाहिजे, मग गोंडस मुलगी का नको?
- लिंगभेद विकासाला छेद.
- जपूया एकात्मता, लिंगभेद न जुमानता.
- स्त्री–पुरुषांमध्ये ठेवा समानता, समाजात पसरवू नका असमानता.
- मुलगा शिकला तर एक घर उजळेल आणि मुलगी शिकली तर दोन घरे उजळतील.
- मुलगा आहे तुमचा वारस तर मुलगी आहे जीवनाची पारस.
- मुलीला समजू नका घाण, ती आहे देशाची शान!
- मेरी बेटी मेरा अभिमान!
- मुलगी शाप नाही ती वरदान आहे.
- मुलीला समजू नका भार, ती तर आहे जीवनाचा आधार.
- मुलगी नाही आपत्ती; ती तर आहे देशाची संपत्ती!
- मुलगा–मुलगी एक समान, दोघेही उंचावतील देशाची मान!
- द्या शिक्षणाला गती, व्हा फुले सावित्री!
- नारी शक्ती भारी, तिला का समजता बिचारी.
- मुलगी शिकली प्रगती झाली.
- लेक वाचवा लेक शिकवा!
- मीना राजू मंच ने ठाना है, हर बच्चे को स्कूल लाना है!
- मुलींचे शिक्षण प्रगतीचे लक्षण!



- मुलींना शिकू द्या, फुलाप्रमाणे फुलू द्या.
- मुलांना शिकवा, मुलींना शिकवा देशात साक्षरता वाढवा.
- मुलगा–मुलगी भेद नको, मुलगी झाली खेद नको.

## परिशिष्ट २ – खुलजा सीम सीम खेळासाठीची विधाने

- मुली भावनिक असतात.
- मुले/पुरुष कठोर असतात.
- मुलींनी अभियांत्रिकीसारखे उच्च शिक्षण घ्यायला नको; कारण अशाने एखाद्या मुलाला मदत होऊ शकणारी सीट त्या वाया घालवतात.
- मुली क्रिकेट खेळू शकत नाहीत.
- मुलांनी रडू नये.
- मुलांचे गणित चांगले असते.

## परिशिष्ट ३ – सापशिडी वाक्ये

- मुलींच्या जन्माचा आनंद साजरा करणे.
- मुलींवर होणाऱ्या मारहाणीचा विरोध करणे.
- मुलीला शिक्षणासाठी मुलासारखी संधी देणे.
- मुलीच्या झालेल्या छेडछाडीबद्दल तिलाच दोष देणे.
- मुलीला मुला इतकाच पोषक आहार देणे.
- मुलींनी/स्त्रियांनी सर्वांत शेवटी जेवण करावे.
- मुलींना उच्च शिक्षणाची गरज नसते.
- घरातील कामांची जबाबदारी फक्त मुलींची आहे.
- घरकामात मुलांचा सहभाग असावा.
- निर्णयामध्ये स्त्रीला सामील करून घेणे.



- मुलगा हा वंशाचा दिवा आहे.
- मुलीच्या नकाराला होकार समजणे.

## परिशिष्ट ४ – चळवळीची गाणी

- **समतेच्या वाटेनं**

समतेच्या वाटेनं,
तू खणकावत पैंजण यावं तू यावं,
तू यावं, तू यावं बंधन तोडीत यावं ... ।।धृ।।
शेतात रानात, जिथं घामानं भिजली धरती
हिरव्या पिकांवरती, जिथं राघू हो डोलती
ऐसी या कष्टाची महती, गान कोकिळा बोलती,
त्या सरीसरीतून, घाम–अत्तर लेवून यावं
तू यावं, तू यावं...
वाडे जातीपातीचे ज्यात माणसं कोंडली
ऐसे जबरी विष, पिढी पिढी हो पोळली,
हाडामासाची माणसं, कशी ना दिसली?
माणसं माणसाला कशी परकी हो झाली?
वाडे जातीपातीचे, तू तोडत फोडत यावं,
तू यावं, तू यावं...
अन्यायाविरुद्ध जिथं मुठी हो वळल्या
इवल्याशा या चिमण्या, जिथं घारीशी हो भिडल्या,
त्या युद्धभूमीतून, रक्तचंदन लेवून यावं,
तू यावं, तू यावं बंधन तोडीत यावं ...



- **डोळं तुमचं डोळं**

डोळं तुमचं डोळं, तुमच्या डोळ्यांची मला भीती
खाली बघून चालू किती?
माझ्या आईची शिकवण मला
नाही डोळ्यां कधी डोळा दिला
तुमचं डोळं प्रश्न पुसती, खाली बघून...
मी कुमारी की श्रीमती
की आहे सौभाग्यवती?
मी कुणाच्या मालकीची?
तुमचं डोळं प्रश्न पुसती, खाली बघून.....
नाव सांगून भागत नाही
तुम्हा हवं आडनावही
आडनावात गं बाई
साऱ्या लपल्या जातीपाती, खाली बघून...

- **सावित्रीचं नमन**

पहिली माझी ओवी गं, सावित्रीच्या बुद्धीला
स्त्रियांच्या शिक्षणाचा पाया तू घातला।।
अशिक्षित अडाणी तू, पतीपाशी शिकली
मुलींसाठी पहिली शाळा तुम्ही काढली।।
दुसरी माझी ओवी गं, तुझ्या गं धैर्याला
दगड-गोटे खावुनी, चालवली तू शाळा
घराबाहेर काढले, गुंडांनी अडविले
धीराने तोंड दिले, सगळ्या गं त्रासाला।।
तिसरी माझी ओवी गं, तुझ्या मोठ्या मनाला



फसलेल्या विधवेचा सांभाळ तू केला
अनाथ नि अबलांचे मायबाप होवुनी
यशवंत बाळाला दत्तक घेतला ।।
चौथी माझी ओवी गं, तुझ्या थोर ह्रदयाला
माणुसकीचा झरा त्यात, नित्य गं वाहिला
जोतिबाची साऊली नाही तू राहिली
तर सत्यधर्म प्रकाशात तेजानं तळपली ।।
दुःखितांच्या सेवेत, देह तू ठेविला
स्मरण तुझे करूनी, वसा मी घेतला
भगिनींना जागविन, संघटीत करीन
ज्ञानज्योत लावीन, हेच तुला नमन ।।

- **स्त्री जातीच्या मुक्तीसाठी....**

स्त्री जातीच्या मुक्तीसाठी, आले महात्मा फुले गं
आले महात्मा फुले, मुलींचे शिक्षण केले खुले गं
ना ज्ञान मिळाले कधी, त्या दुबळ्या जातीमधी
फुलू लागल्या कळ्या कोवळ्या, फुलू लागली फुले गं
ओढ ज्ञानाची वाढली, शाळा पोरांची काढली
तेव्हापासून शिकू लागली, अस्पृश्यांची मुले गं
ज्या महान क्रांतीमुळे, समतेशी नाते जुळे
त्या क्रांतीची थोर पताका, अजूनी गगनी डुले गं
आज वामनची बाईल, गीत क्रांतीचे गाईल
त्या क्रांतीचे स्त्री–मुक्तीचे, दारच केले खुले गं

• **गावचा पुढारी...**

गावकरी दादा माझा पोवाडा, ध्यान देऊनशान ऐकावा
गावचा पुढारी, गाव कैवारी कसा असावा–नसावा ।।
गावा सुधारणारा, लोका शिकविणारा, शहाणा पुढारी असावा
अडाणी जनता त्याच्यावर जगता, बंगले उभारणारा नसावा ।।
मनात धरणारा, जनात बोलणारा तसंच करणारा असावा
ओठांवर एक अन् पोटात एक, दुतोंडी भोंदू नसावा ।।
बंधुभावानं, एकजुटीनं मिळणारा, जुळणारा असावा
गरिबाची होळी त्याच्यावर पोळी भाजून गिळणारा नसावा ।।
डोळ्याला चाळिशी, मुलखाचा आळशी, वटवट करणारा नसावा
उपाशीपोटी जनतेसाठी खटपट करणारा असावा ।।
जुलमाला चिडणारा, गनिमाला भिडणारा, शूर शिलेदार असावा
लाचार कुत्रा, मुलखाचा भित्रा, गोंडा घोळणारा नसावा ।।

**– पु. ल. देशपांडे**

• **मन शुद्ध तुझं.....**


मन शुद्ध तुझं गोष्ट हाय पृथ्वी मोलाची
तू चाल रं पुढं तुला रं गड्या भीती कशाची
पर्वा रं कुणाची...?
जो वळखत असे ओक्ष म्हणजी मोठी लढाई
अन् घनाचं ते फुलावाणी घाव बी खाई
गळ्यात पडल माळ त्याच्या जयाची
तू चाल रं पुढं......
झेंडा भल्या कामाचा जो घेऊन निघाला
वाटमंदी काटंकुटं भेटती त्याला
अरं रगात निघल तरी बी हासल



शाब्बास त्याची
तू चाल रं पुढं.......

- **सावु पेटती मशाल....**

सावु पेटती मशाल, सावु आग ती जलाल
सावु पेटती मशाल, सावु शोषितांची ढाल, सावु मुक्तीचं पाऊल.....
साद दिली पाखरांना, सारं रान धुंडाळून
फडफडले ते पंख, झेपावल नवं गाणं
सावु वाघिण आमची, तिनं फोडली डरकाळी
थरथरल्या काचा कोया, गड ढासळल गं बाई....
दूध ज्ञानाचे पाजले, गर्भ यातना सोसून
येल मांडवाला जाई, ज्ञान चांदण
हरणं चालली कळपात, कशी निर्भय तोऱ्यात
स्वाभिमानाची गं ऊब, आत्मभान पांघरुण....
घुसमट काळजाची, माझ्या आजही पदरी
कधी ढिली कधी जाम, माझ्या येसणीची दोरी
जरी मोकळा गं श्वास, माझ मन जायबंदी
झळकते गं वरून, अंधारलं आतमंदी
मुक्या माऊलीची साद, सावु घुंगाराचा नाद
सावु लावण्याचा साज, सावु झाकलेली लाज....
आता नको कोंडमारा, नको विषारी हा वारा
नको दासीपण आता, नको जुलमाचा पहारा
ज्योत लाविलीस सावु, वणवा मी पेटविण
तुजे शिल्प कोरलेस, ते मी बोलके करीन...
ज्योती क्रांतीबा जनांचा, तशी क्रांतिज्योत सावु



त्यांनी लावियेले रोप, आम्ही नभाला भिडवू
साव क्रांतीची गं येल, सावु समतेची चाहूल
सावु शोषितांची ढाल, सावु मुक्तीचं पाऊल....

**– कबीर कला मंच**

- **पाडू चला रे भिंत ही....**

पाडू चला रे भिंत ही, मध्ये आड येणारी
या मनामनातून बांधूया, एक वाट जाणारी
सांधूया तो पूल, जोडू प्रीती त्यावरी
या मनामनातून...
कोण, कोण तू आहे
कोणाला हे कळले आहे
चल विसरू हे मतभेद, नका होऊ अविचारी
या मनामनातून...
हा हिंदू, मुस्लिम तू रे
भेद कसा हा मानव सारे
जातीसवा धर्मापरी ही मानवता प्यारी
या मनामनातून...
तुफान वादळे भवती
दर्यावरती लाटा येती
मग एकीत रे चालवू ही नाव तरणारी
या मनामनातून...

**– वसंत माने**



## परिशिष्ट ५ – संगीत खुर्ची

- स्त्रियांना घराबाहेर काम करायला बंदी केली.
- मुलींना उच्च शिक्षणासाठी पाठवले जात नाही; कारण त्यांचा जन्म लग्न करण्यासाठी आणि घर सांभाळण्यासाठीच झाला आहे, असा समज आहे.
- वर पक्षाने मुलींकडून हुंडा घेतला.
- कुटुंबाला एकत्र ठेवण्यासाठी स्त्रीने हिंसा सहन केली पाहिजे.
- बायकोला मर्यादेत ठेवण्यासाठी काही प्रसंगी तिला मारहाण केली.
- पुरुषांकडून अत्याचार होतील या भीतीने मुलीचे कपडे, खेळणे, फिरणे, जबाबदाऱ्या घेणे यांवर बंधने घातली.
- कुटुंबाला पोसणे ही फक्त पुरुषाची जबाबदारी आहे.
- पुरुषाने कणखर असलेच पाहिजे.
- मुलीच्या रक्षणाची जबाबदारी तिच्या भावाची असते.
- मासिक पाळीच्या काळात मुलींना धार्मिक कार्यक्रमात जाऊ देऊ नये.
- रडणारा किंवा मुक्तपणे भावना व्यक्त करणारा पुरुष म्हणजे दुबळा पुरुष.
- शाळा सोडून लहान भावंडाला सांभाळणे ही बहिणीची जबाबदारी आहे.
- शाळा दूर असल्यास मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून तिचे शिक्षण थांबविणे योग्य आहे.
- चांगले स्थळ आले तर मुलीचा विवाह करणे योग्य आहे.

## परिशिष्ट ६ – नेमबाजी

- 'बऱ्याच उद्योगांमध्ये समान कामासाठी स्त्रिया पुरुषांपेक्षा कमी कमावतात.'
- 'स्त्री आणि पुरुष यांच्या वेतनातील तफावत हे साधारण आहे.'
- 'मुलींना जास्त शिक्षण म्हणजे जास्त हुंडा'.
- 'मुलगा आणि मुलगी यांच्या शिक्षणामध्ये असमानता असायला पाहिजे.'
- 'लिंग–आधारित हिंसा ही एक जागतिक महामारी आहे.'
- 'महिला सत्ता/राजकारण सांभाळू शकत नाहीत.'
- 'राजकारण आणि व्यवसायात, महिलांचे नेतृत्व ही काळाची गरज आहे.'



## परिशिष्ट ७ – गुलदस्ता

- ‘पारंपरिक आणि सामाजिक अपेक्षा अनेकदा पुरुष आणि स्त्रिया दोघांनाही मर्यादित करतात.’
- ‘महिलांच्या पुनरुत्पादक अधिकारांवर अजूनही जगाच्या अनेक भागांमध्ये वादविवाद आणि त्यावर बोलणे प्रतिबंध आहे.’
- ‘काही संस्कृतींमध्ये, बालविवाह आणि स्त्री जननेंद्रियाचे विच्छेदन यांसारख्या हानिकारक पारंपरिक प्रथा व्यापक आहेत.’
- ‘काळ्या रंगाच्या स्त्रिया बऱ्याचदा परस्पर भेदभावांचा सामना करतात.’
- ‘ट्रान्सजेंडर आणि बायनरी नसलेल्या व्यक्तींना त्यांच्या लिंग ओळखीच्या आधारावर भेदभाव आणि हिंसाचार यांसह अनन्य आव्हानांचा सामना करावा लागतो.’

## परिशिष्ट ८ – वादविवाद

- **गोष्ट १**

  माझे नाव रवी. तसा अभ्यासात मी ठीक आहे, माझे खूप मित्र आहेत आणि ते मला फार जीव लावतात. ‘दिल दोस्ती दुनियादारी’ हे आमचे ब्रीद वाक्य आहे. माझ्या घरच्यांना माझे मित्र आवडत नाहीत; कारण ते मावा खातात, सिगरेट पितात, परंतु मी काही हे करत नाही. कधी कधी ते मला बोलतात, की ट्राय करून बघ पण मला आवडत नाही. एके दिवशी त्यांनी मला मैत्रीची शपथ दिली आणि मी सिगारेट ओढली. ही हिंसा आहे का?

- **गोष्ट २**

  जेव्हा मी जन्मलो तेव्हा माझ्या पालकांनी माझे नाव तेजस ठेवले, पण आता मला हे माझे नाव असू शकते का ते मला कळत नाही. बघा, मी जेव्हा लहान होतो तेव्हा मी इतर मुलांसारखाच होतो, पण जसजसा मी मोठा झालो तेव्हा मला वाटले की, मी वेगळा आहे. मी माझ्या वर्गात नेहमी मुलींशीच मैत्री केली, मुलांसोबत केलीच नाही. माझा आवडता खेळ हा ‘घर घर’, मला चपाती आणि पुरण पोळी बनवायला आवडते. मी जेव्हा ९ वर्षांचा असताना माझ्या कुटुंबातील एका लग्नसमारंभात मी सहभागी झालो होतो. तेव्हा माझ्या काकूने मला एक प्रश्न विचारला की, ‘‘तुला मोठे होऊन काय बनायचे आहे?’’ मी म्हणालो, ‘‘मला मोठे होऊन आई बनायचे आहे.’’ तेव्हा ते माझ्यावर हसले कारण मी लहान आहे. माझी काकू म्हणाली, ‘‘पुढे जाऊन तू आई नाही तर तू बाबा होणार!’’ नंतर आम्ही घरी आल्यावर मी जे काही तिकडे बोललो त्यावर ते रागावले होते.



या घटनेनंतर, त्यांना जसा मुलगा हवा तसा होण्याचा मी नेहमी प्रयत्न करत राहिलो. जेणेकरून त्यांना माझ्यावर गर्व वाटेल. मी माझ्यातील जो फरक आहे, तो त्यांच्यापासून लपवून ठेवला होता. तरीही माझ्यातील जे अंतरिक विचार होते, ते मी माझ्या डायरीत लिहित असे. माझ्यातील दुसरी तेजश्री मी लिहित असे, जी आपल्या आईबाबांवर खूप प्रेम करायची, तिला खूप मित्र आहेत आणि तिचा मुलगा मित्र तिला/मला सुंदर अशा भेटवस्तू देत. पण, काही दिवसांनी माझे शिक्षक हे माझ्या बाबांना भेटले आणि शिक्षकांनी त्यांना सांगितले की, माझ्यात मुलींसारखे हावभाव आहेत. स्वभावही तसाच आहे. आता माझ्या वडिलांनी माझ्या डोळ्यांत पहिले आणि माझ्याशी बोलण्याचा प्रयत्न केला, पण मला कळत नव्हते की, मी काय करावे? मला जे वाटतंय ते सारं खरं सांगून टाकावं की, जसे मी आजपर्यंत स्वतःला आणि दुसऱ्यांना अपेक्षित असलेल्या पुरुषासारखे वागावे, जे माझ्या आंतरिक आवाजाच्या विरुद्ध आहे. काहीच कळायला मार्ग नव्हता. मी धोका पत्करून त्यांना सर्व सांगावे की, मी खरा कोण आहे ते? आणि मग काय, ते मला त्यानंतर घरातून हाकलून देतील? की माझे बाबा आणि घरातील सर्व मंडळी मला स्वीकारतील? मी कधी तेजश्री होऊ शकेन का? आणि मी जो विचार करते ते आयुष्य मी जगू शकेन का?

- **गोष्ट ३**

मीना इयत्ता आठवीमध्ये शिकत आहे, तिचे वय १४ वर्षे आहे. ती अभ्यासात तशी बरी आहे. मीना घरातले आणि शेतातले सर्व काम अगदी चोखपणे करते. मीनाच्या घरातील लोक तिच्या लग्नाबद्दल चर्चा करीत आहेत. हे ऐकून मीनाला फार आवडते; परंतु तिला भीती देखील वाटते, की आपण कोणाच्या घरात जाणार? पुढे कसे होणार? असे बरेच असंख्य प्रश्न मीनाच्या मनात निर्माण होत आहेत. ही हिंसा आहे का?

- **गोष्ट ४**

श्यामचे त्याच्या पत्नीवर खूप प्रेम आहे. तो तिची खूप काळजी घेतो. तो नेहमी तिला शॉपिंग आणि बागेत फिरायला घेऊन जातो. एक दिवस त्याच्या पत्नीच्या हातून भाजीत मीठ थोडं जास्त टाकले जाते. त्यावेळी श्यामला राग येतो आणि तो त्याच्या पत्नीच्या कानाखाली लावतो. ही हिंसा आहे का?

- **गोष्ट ५**

नितीन आणि प्रियंका हे नवीन विवाहित जोडपं आहे, त्यांचे एकमेकांवर खूप प्रेम आहे. प्रियंका सुशिक्षित असून नोकरी करणारी स्वावलंबी मुलगी आहे. नितीनच्या घरची आर्थिक परिस्थिती उत्तम आहे, त्याच्या आईवडिलांना प्रियंकाचे नोकरी करणे आवडत नाही, त्यामुळे नितीन प्रियंकाची समजूत घालून तिला नोकरी सोडण्यासाठी सांगतो आणि प्रियंका ते मान्य करते. ही हिंसा आहे का?



- **गोष्ट ६**

समाधान हा इयत्ता आठवीमध्ये शिकत आहे. अभ्यासात तसा तो ठीकठाक, परंतु खेळामध्ये उत्तम आहे आणि वर्गात तो खोडकर सुद्धा आहे. खोड्या काढणे, मस्ती करणे हे त्याला फार आवडते. एके दिवशी शिक्षक त्याला गृहपाठ पूर्ण न केल्यामुळे बाकावर उभं करतात/दोन मुलींच्या मध्ये त्याला बसवतात. ही हिंसा आहे का?

- **गोष्ट ७**

राजू हा इयत्ता दुसरीमध्ये शिकत आहे, तो फार चुणचुणीत आणि चंचल आहे. शाळेमध्ये सर्वांचा तो लाडका व घरातही. त्याच्या शेजारचे काका त्याचा फार लाड करतात आणि ते नेहमी त्याला आपल्यासोबत फिरायला आणि शॉपिंगला घेऊन जातात. राजूला सुद्धा काका फार आवडतात. कधी कधी काका राजूला आपल्या मांडीवर घेऊन लाड करतात. कधी त्याचे मुके घेतात तर कधी त्याला शेजारी घेऊन झोपी जातात. ही हिंसा आहे का?

- **गोष्ट ८**

मधुरा एक गोंडस मुलगी, इयत्ता सातवीमध्ये ती शिकते. घरी गेल्यानंतर आईला कामात मदत करते. आणि अभ्यासही करते. अभ्यासासाठी ती शेजारच्या काकूंकडे जात असे, परंतु गेले काही दिवस तिने त्यांच्या घरी जाण्याचे बंद केले आहे. तसेच ती शांत राहू लागली आहे. तिच्या मैत्रिणीने तिला विचारल्यावर तिने सांगितले की, शेजारचे काका तिला स्पर्श करतात; जे तिला अजिबात आवडत नाही. ही हिंसा आहे का?

- **गोष्ट ९**

अजय इयत्ता सहावीतील मुलगा. त्याच्या घरात तो सर्वांत मोठा. घरची आर्थिक परिस्थिती बिकट. शाळा सोडून तो गावातल्या वीट भट्टीवर काम करू लागला. ही हिंसा आहे का?

- **गोष्ट १०**

मी उषा महिला बचत गट चालविते, माझ्या गावात जवळ जवळ २० महिला बचत गट आहेत आणि या सगळ्यांचा लेखाजोखा मी पाहते. गावातील सर्व महिला मला ओळखतात आणि काही अडचण असल्यास माझ्याकडे येतात. मी सर्व महिलांसोबत काम करते; परंतु आमच्या गावातील म्हणजे समाजातील महिलांचे म्हणणे आहे की, त्या गावाबाहेरच्या वस्तीमधल्या महिलांसोबत जास्त संबंध ठेवू नकोस. त्या दुसऱ्या समाजातील आहेत. मला कधी कधी त्यांचे म्हणणे पटते; परंतु कळत नाही, की मी काय करू? ही हिंसा आहे का?

◆◆◆

